**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ३९/२०१६-१७/२९ दिनांक: २०-०१-२०१७

**आदेश**

**आदेश केस क्र. ३९/२०१६-२०१७**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. सर्जेराव रामा पाटील<br>मु. पो. अंत्री खूर्द<br>ता. शिराळा, जिल्हा. सांगली : | **तक्रार अर्जदार (ग्राहक)** |
| | **विरुध्द** | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, सांगली. | |
| २) | कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, इस्लामपूर | **विरुध्द पक्षकार** |
| ३) | उपकार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपविभाग शिराळा | |

**कोरमः-** १.श्री वि.श. गुळवणी, अध्यक्ष
२.श्री. प्र.वि. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

मी वि.श. गुळवणी अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय देत आहे.

१) तक्रारदार श्री सर्जेराव रामा पाटील रा. अंत्री खूर्द ता. शिराळा. जि. सांगली (ग्राहक क्रमांक २७२८४०००१७६८) यांनी त्यांच्या स.नं. १०८७ या शेत जमिनीमध्ये पाच अश्वशक्ती मोटरसाठी नविन वीज जोडणी मिळणेसाठी वितरण कंपनीकडे अर्ज करुन दिनांक १६-०६-२०१६ रोजी रु. ५३५०/- भरणा केले मा. विद्युत नियामक आयोगाच्या कृति मानके विनियमाप्रमाणे, वितरण वाहिनीचा विस्तार असल्यामुळे तक्रारदार यांना ३ महिन्यात विद्युत पुरवठा मिळणे आवश्यक होते. तसा वीज पुरवठा सदर मुदतीत त्यांना मिळाला नाही म्हणून त्यांनी दिनांक २९-०९-२०१६ रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे गा-हाणे दाखल केले. सदर कक्षाने दिनांक २३-११-२०१६ च्या आदेशाने, प्रतिक्षा यादीप्रमाणे तक्रारदार यांना वीज जोडणी देणेत येईल असे कळविले, कक्षाचा सदर निर्णय अमान्य झाल्यामुळे तक्रारदार यांनी या मंचासमोर दि. १६-१२-२०१६ रोजी गा-हाणे दाखल केले आहे.

२) वितरण कंपनीतर्फे लेखी निवेदन दाखल करण्यात आले असून त्यामध्ये असे कथन केले आहे की, तक्रारदार यांना वीज पुरवठा करण्यासाठी ०.४८ कि.मी.३ फेज ४ वायर लघुदाब वाहिनी उभारणी करणे आवश्यक आहे. प्रतिक्षा यादीमधील तक्रारदार यांचा ३१४ वा क्रमांक आहे. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठयाच्या इतर अटी ) विनियम २००५ मधील परिच्छेद ४.४ प्रमाणे तक्रारदार यांना प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य या तत्वावर विद्युत पुरवठा करणेत येईल असे वि.प. यांचे म्हणणे आहे.

३) तक्रारदार यांनी कोटेशन व दि. १६-०६-२०१६ च्या पावतीच्या छायांकित प्रती आणि अंतर्गत तक्रार निवारण कक्षाच्या आदेश असे कागद दाखल केले आहेत.

या प्रकरणाची सुनावणी दि. १९-०१-२०१७ रोजी मंचासमोर घेणेत आली. त्यावेळी तक्रारदार स्वतः आणि वि.प. तर्फे अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री डी.के. कोरडे व उपकार्यकारी अभियंता श्री एस.पी. पाटणकर यांची तोंडी निवेदने ऐकणेत आली. सर्व उपलब्ध कागदपत्रे वाचण्यात आली आहेत.

४) या मंचाचे निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होतात.

(१) तक्रारदार यांना त्यांच्या मागणी प्रमाणे त्यांच्या कृषि पंपासाठी नविन वीज जोडणी देण्याचा आदेश करणे योग्य होईल काय?

उत्तरः- होय.

(२) कोणता अंतिम आदेश?

उत्तर :- शेवटी नमूद केल्याप्रमाणे

## <u>कारणमिमांसा</u>

५) उपलब्ध कागदपत्रां वरुन हे स्पष्ट होते की, तक्रारदार यांनी त्यांच्या स.नं.१०८७ मध्ये कृषि पंपासाठी नविन वीज जोडणी मिळणेबद्दल रितसर अर्ज देऊन दि. १६.०६.२०१६ रोजी वि.प. कडे रु. ५३५०/- भरणा केले. तक्रारदार यांना नविन वीज जोडणी शेती पंपासाठी देणे करिता, ०.४८ कि.मी. ३ फेज ४ वायर लघुदाब वाहिनी उभारणी करणे आवश्यक आहे तक्रारदार यांना ३ महिन्यामध्ये वीज जोडणी मिळाली नाही.

प्रतिक्षा यादीचे अवलोकन करता तक्रारदार यांचा ३१४ वा क्रमांक आहे. ही जेष्ठता यादी जून २०१३ पासूनची आहे.

६) वि.प. यांचे असे निवेदन आहे की, तक्रारदार यांना त्वरीत वीज जोडणी दिल्यास , सन-२०१३ पासून प्रतिक्षा यादीतील पैसे भरलेल्या अगोदरच्या सर्व शेतक-यांवर अन्याय होणार आहे, आणि उपरोक्त विनियम २००५ मधील परिच्छेद ४.४ प्रमाणे तक्रारदार यास प्रतिक्षायादी प्रमाणे वीज जोडणी देणे योग्य होईल. या ऊलट तक्रारदारतर्फे असे निवेदन केले की,जेष्ठता/प्रतिक्षा यादी अशी कोणतीही संकल्पना विद्युत कायद्यात नमूद नाही आणि जर वितरण कंपनीस कृतिमानके साध्य करणेस काही अडचणी येत असतील तर त्या विद्युत नियामक आयोगाकडून निवारण करुन घेणे आवश्यक राहिल.

७) तक्रारदार यांच्या निवेदनात तथ्य असल्याचे निश्चितपणे दिसून येते. प्रत्यक्षात जरी काही अडचणी असल्या तरी कृति मानके विनियम या मधील तरतूदी विचारात घ्याव्याच लागतील. ग्राहकाने सबब त्वरीत वीज जोडणी देणेचा आदेश व्हावा एवढीच विनंती या मंचासमोर केली आहे. ती मान्य करावी लागेल.

तक्रारदार यांना विशिष्ट मुदतीत नविन वीज जोडणी मिळणेचा अधिकार होता याबद्दल वाद असू शकणार नाही.

वरील विवेचनावरुन असे निश्चित होते की, तक्रारदार यांचा गा-हाणे अर्ज खालील प्रमाणे मंजूर होणेस पात्र आहे.

**आदेश**

१) तक्रारदार यांना त्यांच्या मागणी प्रमाणे कृषी पंपासाठी नविन वीज जोडणी, नियमानुसार, दिनांक ३०-०४-२०१७ पर्यन्त वि.प. वितरण कंपनी यांनी द्यावी असा वि. प. यांना आदेश करणेत येत आहे.
२) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.
३) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| सही/- | सही/- | सही/- |
| (श्री प्र. स. बुरांडे) | (प्र.वि. खपली) | (वि. श. गुळवणी) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |